‘नीट-पीजी’ सीईटीसाठी औरंगाबादला केंद्र द्या -सतीश चव्हाण

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : राष्ट्रीय परीक्षा मंडळातर्फे जानेवारी-२०१८ मध्ये वैद्यकीय क्षेत्रातील ‘एमएस’, ‘एमडी’सह पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ‘नीट-पीजी’ परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी यावर्षी औरंगाबादचे केंद्र रद्द केले आहे. हे रद्द केलेले केंद्र पुन्हा सुरु करण्याची मागणी करणारे निवेदन मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर, राष्ट्रीय परीक्षा मंडळ यांच्याकडे केली आहे.

वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एमबीबीएस, बीडीएससह इतर पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी ‘नीट-पीजी’ द्यावी लागणार आहे. ही परीक्षा ७ जानेवारी २०१८ रोजी देशभरातील १२९ केंद्रांवर घेण्यात येईल.

गेली दोन वर्षे ‘नीट-पीजी’ परीक्षेसाठी औरंगाबाद केंद्र होते. या केंद्रावर दहा हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षा देत होते; परंतु यावर्षी १२९ केंद्रांमध्ये औरंगाबादचा समावेश केलेला नाही. मराठवाड्यात नांदेड हे ऐकमेव केंद्र आहे. औरंगाबादसह मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना नांदेड येथील केंद्रावर परीक्षा द्यावी लागणार आहे. ही परीक्षा देण्यासाठी पालकांना विद्यार्थ्यांसोबत प्रवास, राहण्याचा, परीक्षा शुल्क आदींवर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागेल.

या खर्चाचे प्रमाण प्रतिविद्यार्थी ८ ते १० हजार रुपये असणार आहे. औरंगाबाद शहरात आजघडीला नामांकित शैक्षणिक संस्था असून, मराठवाड्याबरोबरच जळगाव, अहमदनगर, बुलडाणा, धुळे आदी जिल्ह्यांतील विद्यार्थी याठिकाणी मोठ्या प्रमाणात शिक्षण घेत आहेत. त्यामुळे औरंगाबाद येथील ‘नीट-पीजी’चे परीक्षा केंद्र वगळल्यामुळे विद्यार्थी, पालकांकडून आश्चर्य व्यक्त होत आहे. त्यामुळे हे रद्द केलेले परीक्षा केंद्र पुन्हा सुरु करण्याविषयी योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणीही आ. चव्हाण यांनी निवेदनात केली आहे. याशिवाय केंद्रीय परिवहनमंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे उच्चशिक्षणमंत्री विनोद तावडे यांनीही केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाकडे औरंगाबादला केंद्र देण्यासाठी शिफारस करण्याची मागणी केली आहे.

महामॅरेथॉन नावनोंदणीस धावपटूंचा उदंड प्रतिसाद

औरंगाबादला रंगणार १७ डिसेंबरला महामॅरेथॉन : ऐतिहासिक शहरातील धावपटूंत आतुरता

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : लोकमत समूहातर्फे १७ डिसेंबर रोजी होणाऱ्या महामॅरेथॉनची घोषणा झाल्यानंतर राज्यभरातील धावपटूंमध्ये या मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी आतुरता निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे राज्यभरातून या महामॅरेथॉनमध्ये सहभागी होण्याच्या नावनोंदणीसाठीही उदंड प्रतिसाद मिळत आहे. वैयक्तिक आणि सामूहिक नोंदणीवरही नागरिक, धावपटू, कंपन्यांतील कर्मचारी, महिला यांचा मोठ्या प्रमाणावर कल आढळून आलेला आहे. यंदा सर्व संरक्षक दले, पोलीस, होमगार्ड आणि विशेष राखीव दलातील धावपटूंसाठी दिले जाणारे विशेष बक्षीसही या महामॅरेथॉनचे वैशिष्ट्य ठरणार आहे.

गतवर्षी आयोजित लोकमत औरंगाबाद मॅरेथॉनला मराठवाडाच नव्हे तर महाराष्ट्रातील व राज्याबाहेरील तसेच परदेशातील धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या यशामुळे लोकमत समूहाने यंदा महाराष्ट्रातील चार मोठ्या शहरांत महामॅरेथॉनचे आयोजन केले. याची सुरुवात नाशिक येथे झाली. नाशिक येथील उदंड प्रतिसादानंतर औरंगाबादला १७ डिसेंबर, कोल्हापूरला पुढील वर्षी २८ जानेवारी आणि नागपूरला ११ फेब्रुवारीला महामॅरेथॉन होणार आहे.

या वेळेस महामॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्यांसाठी अविस्मरणीय ठरावी या उद्दिष्टाने ज्या शहरात महामॅरेथॉनचे आयोजन होणार आहे त्या शहराचा नकाशा असलेले पदक विजेत्यांना देण्यात येणार आहे. नाशिक येथे महामॅरेथॉनमधील विजेत्यांना दिलेल्या मेडलवर त्या शहराचा नकाशा आहे. अशीच बाब अन्य तीन शहरांत होणाऱ्या महामॅरेथॉनमधील विजेत्यांनादेखील त्या-त्या शहराचा नकाशा असलेले मेडल बक्षीस दिले जाणार आहे. चारही शहरांतील ‘लोकमत महामॅरेथॉन’मध्ये सहभागी होऊन मेडल जिंकेल व ती चारही मेडल एकत्र जुळवल्यानंतर आपल्या ‘महाराष्ट्राचा’ नकाशा बनणार आहे.

नावनोंदणीसाठी त्वरा करा

लोकमत समूहातर्फे १७ डिसेंबर रोजी आयोजित महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग २५ नोव्हेंबर निश्चित करता येणार आहे. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत करता येणार आहे. या महामॅरेथॉनमध्ये शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आयोजकांतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

लोकमत Presents
Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
17 Dec 2017
Associate Sponsor riso
Powered by DHOOT TRANSMISSION

Circuit Run

Run Type	Cities	Invitation Price (Including GST)
21K	3 cities	₹2520
	2 cities	₹1920

Run Type	Cities	Invitation Price (Including GST)
10K	3 cities	₹2020
	2 cities	₹1540

यंदा सर्व संरक्षक दले, पोलीस, होमगार्ड आणि विशेष राखीव दलातील धावपटूंसाठी दिले जाणार विशेष बक्षीस.

२५ नोव्हेंबरपूर्वी नोंदणी केल्यास विशेष सवलत

Distance	Regular Fee	Early Bird Fee (Before 15th Nov.)	Registration Fee Includes
3 KM Family Run (2 Adults + 2 Children (<12))	₹1200	₹960	Goodie Bag + Medal + Breakfast
5 KM Adult 12+	₹600	₹480	T Shirt + Goodie Bag + Medal + Breakfast
10 KM Adult 16+	₹950	₹760	T Shirt + Goodie Bag + Certificate + Finisher Medal + Timing Chip + Breakfast
21 KM Adult 18+	₹1200	₹960	T Shirt + Goodie Bag + Certificate + Finisher Medal + Timing Chip + Breakfast
Defense 21 KM	₹1200	₹800	T Shirt + Goodie Bag + Certificate + Finisher Medal + Timing Chip + Breakfast

लोकमत महामॅरेथॉन

औरंगाबाद 17/12/2017
कोल्हापूर 28/01/2018 | नागपूर 11/02/2018

स्पर्धा
Half Marathon - 21 Kms
Power Run - 10 Kms
Fun Run - 5 Kms
Family Run - 3 Kms

लोकमत समूहातर्फे आयोजित औरंगाबाद महामॅरेथॉनचे हे सलग दुसरे वर्ष असून, अशा प्रकारचे उपक्रम म्हणजे औरंगाबादसाठी एक पर्वणीच आहे. या उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा.
- अनिल मुनोत

लोकमत महामॅरेथॉन एक स्तुत्य उपक्रम आहे. औरंगाबादचा औद्योगिक विकास व तसेच स्वच्छ, सुंदर व खड्डेमुक्त औरंगाबाद असा संदेश या उपक्रमातून पुढे यावा यासाठी जास्तीत जास्त संख्येने या उपक्रमात सहभागी व्हावे.
- राहुल धूत

लोकमत औरंगाबाद महामॅरेथॉन हा एक अतिशय प्रशंसनीय असा उपक्रम आहे. महिला सक्षमीकरण व संरक्षण असा संदेश या उपक्रमातून समाजात पसरवण्यात यावा व त्यासाठी जास्तीत जास्त महिलांनी या उपक्रमात सहभागी व्हावे.
- राजेश वरगंटवार

लोकमत औरंगाबाद महामॅरेथॉनचे हे सलग दुसरे वर्ष आहे. अशा प्रकारच्या उपक्रमाला औरंगाबादकरांचा भरभरुन प्रतिसाद मिळतो हे कौतुकास्पद आहे. दरवर्षी अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन व्हावे.
- मनोज काला

लोकमत औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये संपूर्ण औरंगाबाद एकत्र धावणार आहे. एकजुटीने धावणाऱ्या औरंगाबादकरांनी जास्तीत जास्त संख्येने या उपक्रमात सहभागी व्हावे आणि एकात्मतेचे दर्शन घडवावे.
- मनीष पारेख

लोकमत औरंगाबाद महामॅरेथॉनचे आयोजन म्हणजे औरंगाबादच्या सर्वांगीण विकासासाठी एक पूरक उपक्रम असून, औरंगाबादच्या सर्वांगीण विकासासाठी जास्तीत जास्त लोकांनी यात सहभागी व्हावे.
- महेश लाभशेटवार

समाजासाठी लोकमत समूहातर्फे नेहमीच स्तुत्य उपक्रम राबवण्यात येतो. लोकमत औरंगाबाद महामॅरेथॉनदेखील असाच उपक्रम आहे. नागरिकांनी निरोगी व स्वस्थ आरोग्यासाठी मोठ्या संख्येने या महामॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे.
- ललित झांबड

सेवानिवृत्तांची चांदी; नवीन लोकांना संधीच मिळेना

नियोजनाचा अभाव : प्राध्यापकांच्या रिक्त जागांनी शंभरी ओलांडली; पूर्णवेळ कर्मचाऱ्यांपेक्षा कंत्राटींची संख्याच अधिक

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सेवानिवृत्त झालेले बहुतांश प्राध्यापक विविध पदांवर कार्यरत आहेत. युवा प्राध्यापकांना संधी देण्यात येत नाही. प्राध्यापकांच्या रिक्त जागांनी शंभरी ओलांडली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्येही २५० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. याच वेळी विद्यापीठात कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आकडा ६४५ पेक्षा अधिक झाला आहे. नियोजनाच्या अभावामुळे मागील साडेतीन वर्षांत एकही जागा भरलेली नाही, हे विशेष.

विद्यापीठात कुलगुरु डॉ. बी. ए. चोपडे यांच्या कार्यकाळात अनेक वेळा कुलसचिव, परीक्षा संचालक, वित्त व लेखाधिकाऱ्यांसह प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरण्यासाठी जाहिरात काढण्यात आली. मात्र या जागा काही भरण्यात आलेल्याच नाहीत. विद्यापीठात सद्य:स्थितीला प्राध्यापकांची २८९ पदे मंजूर आहेत. यात ३० पदे विद्यापीठ फंडातून भरण्यात आलेली आहेत. त्या पदांचेही राज्य सरकारने दायित्व स्वीकारले असून, विद्यापीठ प्रशासनाच्या अक्षम्य दिरंगाईमुळे त्या पदांचा निधी मिळालेला नाही. यातच प्राध्यापकांच्या रिक्त पदांचा आकडा १०५ पेक्षा अधिक झाला आहे. राज्य सरकारने नोकरभरतीवर बंदी घातल्यामुळे ही पदे भरता येणार नाहीत. नोकरभरतीवरील बंदी उठण्याची शक्यता सद्य:स्थितीत नसल्यामुळे हा आकडा मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. याच वेळी विद्यापीठात सप्टेंबर २००९ च्या आकृतिबंधानुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ७७७ पदे मंजूर आहेत. यातील केवळ ५१० कर्मचारी सध्या कार्यरत असून, उर्वरित पदे रिक्त आहेत. या पदात वर्ग-१ ची ५४ पदे मंजूर आहेत. यात केवळ २६ पदे भरलेली आहेत. यापैकी दोन जण लीनवर गेलेले आहेत. तर विद्यापीठात ४६५ कंत्राटी कर्मचारी, १२० सुरक्षारक्षक आणि ६० स्वच्छता कर्मचारी कंत्राटी पद्धतीवरच कार्यरत आहेत. हा एकूण आकडा ६४५ पेक्षा अधिक आहे. या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना विद्यापीठ फंडातून वेतन देण्यात येते. मागील साडेतीन वर्षांत शिक्षकेतर कर्मचारी भरती करण्यात आली असती, तर विद्यापीठ फंडाचा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी झाला असता हे नक्की. यातच राज्य सरकारने नोकरभरतीवर बंदी घालताना सुधारित आकृतिबंध सादर करण्याचे आदेश दिले होते.

विद्यापीठ प्रशासनाने हा आकृतिबंध सादर करण्यासही विलंब केला होता. प्रशासनाची दयनीय अवस्था असताना कुलगुरुंना याकडे लक्ष देण्यासही वेळ नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

अनेक विभाग प्राध्यापकांविना

विद्यापीठातील अनेक विभागांत एकही प्राध्यापक कार्यरत नसल्याचे दिसून आले.

या एकही प्राध्यापक नसलेल्या विभागांमध्ये उदार कला, नॅनो टेक नॉलॉजी, म्युझिक, योगा, नृत्यशास्त्र, पाली ॲण्ड बुद्धिझम अशा अनेक विभागांचा समावेश आहे. तर केवळ एकच प्राध्यापक असणाऱ्या विभागांमध्ये भूगोल, प्रिंटिंग टेक्नॉलॉजी, परकीय भाषा अशा विभागांचा समावेश आहे. या सर्व अभूतपूर्व शिक्षक टंचाईवर तोडगा काढण्यासाठी विद्यापीठाने १६ प्राध्यापकांची २४ हजार रुपये मानधनावर ११ महिन्यांसाठी नेमणूक करण्यासाठी शुक्रवारी जाहिरात काढली आहे. हा प्रकार म्हणजे दुधाची तहान ताकावर भागविण्यासारखाच आहे.

हे आहेत सेवानिवृत्त पदांवर कार्यरत

- विद्यापीठात आयुष्यातील बहुतांश कार्यकाळ घालविल्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या अनेक प्राध्यापकांनी विद्यापीठातील अध्यासने, समित्या, स्पेशल ऑफिसर अशी पदे मानधनावर कायम ठेवली आहेत. यामध्ये २०१० साली सेवानिवृत्त झालेले डॉ. सुरेंद्र मेहरोत्रा यांच्याकडे तेव्हापासून श्रीनिवास रामानुजन स्टडी केअरचे संचालकपद कायम आहे. डॉ. यशवंत खिल्लारे यांच्याकडे प्री-आयएएस कोचिंग सेंटरचे संचालकपद आहे. त्यांनी नुकतेच या पदाचे मानधन वाढविण्याचा प्रस्ताव दिला होता. मात्र तो प्रस्ताव वित्त व लेखाधिकाऱ्यांनी थांबविला आहे.
- डॉ. हमीद खान (मौलाना आझाद संशोधन केंद्र), डॉ. एस. टी. सांगळे (ग्रामीण समस्या संशोधन केंद्र), डॉ. सुधीर गव्हाणे (संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र), डॉ. वि. ल. धारुरकर (संचालक, उदार कला), डॉ. सर्जेराव ठोंबरे (संचालक, गोपीनाथ मुंडे ग्रामीण संशोधन संस्था) यांच्याशिवाय डॉ. सूर्यभान सनान्से, डॉ. एम. डी. जहागीरदार हे सेवानिवृत्त कार्यरत आहेत. या पदांवर युवा प्राध्यापकांना संधी देण्याची गरज आहे.

औरंगाबाद खंडपीठाचा निकाल सर्वोच्च न्यायालयात कायम

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार निवृत्तीवेतनाचे लाभ देण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला होता. तो आदेश सर्वोच्च न्यायालयाने नुकताच कायम केला.

तर सरकारचा विशेष परवानगी अर्ज फेटाळला आहे. न्या. अरुणा मिश्रा व न्या. शांतना गौर यांनी नुकताच हा निकाल दिला.

त्यामुळे १ जानेवारी २००६ ते २६ फेब्रुवारी २००९ या काळातील निवृत्त कर्मचाऱ्यांनाही सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे निवृत्तीवेतन मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती औरंगाबाद जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

राज्य शासनाने १ जानेवारी २००६ रोजी सर्व कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्या; परंतु १ जानेवारी २००६ ते २६ फेब्रुवारी २००९ या कालावधीत निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाचे निवृत्तवेतनाचे लाभ नाकारले. ३० ऑक्टोबर २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार केवळ २७ फेब्रुवारी २००९ पासून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनाच सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या होत्या. त्यामुळे राज्यातील हजारो कर्मचारी निवृत्तीवेतनाच्या लाभापासून वंचित राहिल होते.

सदर ३० ऑक्टोबर २००९ चा शासन निर्णय हा निवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये भेदाभेद करणारा व घटनाबाह्य असल्याचा आरोप करीत अनेक कर्मचाऱ्यांनी २०११ साली औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली होती. वरील सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी होऊन खंडपीठाने ९ मे २०१४ रोजी सदर शासन निर्णय घटनाबाह्य ठरवला होता. या निर्णयाला राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. राज्य शासनाचा हा विशेष परवानगी अर्जही आता सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला आहे.

बस रद्द झाल्यास : अधिकाऱ्यांकडून वसुली

एसटी कर्मचाऱ्यांनंतर अधिकाऱ्यांना दणका

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : एस. टी. महामंडळाने कर्मचाऱ्यांनंतर आता अधिकाऱ्यांना दणका देणारा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील शटल आणि विनावाहक बसच्या फेऱ्या रद्द झाल्यास होणारे नुकसान आगार व्यवस्थापक, विभागीय वाहतूक अधिकारी आणि विभाग नियंत्रकांकडून वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एस. टी. महामंडळातर्फे चालक-वाहक तसेच कर्मचाऱ्यांसंदर्भात विविध निर्णय घेण्यात येतात. नुकतेच वेतन क पातीच्या मुद्यावरुन कर्मचाऱ्यांनी चांगलाच संताप व्यक्त केला होता. मध्यवर्ती कार्यालयात नुकतीच विभाग नियंत्रक आणि विभागीय वाहतूक अधिकाऱ्यांची बैठक झाली.

या बैठकीत राज्यातील सर्व विभागांमध्ये २५ ते ३० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक प्रमाणात शटल, विनावाहक बसच्या फेऱ्या रद्द होत असल्याचे समोर आले. या फेऱ्या पूर्ण प्रमाणात चालविण्याची मानसिकता दिसत नसल्याचा ठपका ठेवण्यात आला.

या बसच्या फेऱ्या रद्द झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही ५० टक्के आगार व्यवस्थापक, ३० टक्के विभागीय वाहतूक अधिकारी आणि २० टक्के विभाग नियंत्रकांवर टाकण्यात आली आहे. होणाऱ्या नुकसानीचे दिलेल्या प्रमाणात वसुली केली जाणार आहे. १ नोव्हेंबरपासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

शटल बससेवेच्या माध्यमातून ग्रामीण भाग, जिल्ह्यातील तालुके जोडण्यात आले आहेत. या बससेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. एकट्या मध्यवर्ती बसस्थानकातून दिवसभरात पैठणसाठी ४४, कन्नडसाठी १२, राजूरसाठी २०, सिल्लोडसाठी २२ तर पिशोरसाठी ८ शटल बस धावतात.

बससेवेसाठी दक्ष

नुकसानीची वसुली होणार असल्याचे पत्र आले आहे. शटल बससेवेला चांगला प्रतिसाद आहे. आगारातील बसच्या फेऱ्या रद्द होऊ नये, यासाठी प्रयत्नशील आहोत, असे मध्यवर्ती बसस्थानकाचे आगार व्यवस्थापक स्वप्नील धनाड म्हणाले.